आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२८ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लष्करी विमानांसाठी देशातल्या पहिल्या खाजगी प्रकल्पाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ यांच्या हस्ते उद्घाटन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुजरातमधे करणार ४ हजार ९०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचं लोकार्पण आणि भूमीपूजन

- महाराष्ट्रात निवडणूक अर्ज भरण्याला वेग, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे उमेदवारी अर्ज दाखल

- झारखंडमधे उमेदवारी अर्जांची छाननी सुरु

- जपानमधे सार्वत्रिक निवडणुकीत सत्तापालट

**आणि**

- दीपावलीच्या उत्साहाला आज वसुबारसेने प्रारंभ

**<><><><><>**

गुजरातमधे वडोदरा इथं C-295 लष्करी विमानांच्या निर्मितीसाठी तयार करण्यात आलेल्या टाटा एअरक्राफ्ट संकुलाचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ यांच्या हस्ते आज झालं. टाटा एअरबस प्रकल्प हा मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत लष्करी विमानांसाठीचा भारतातील पहिला खाजगी क्षेत्रातील एरोस्पेस प्रकल्प आहे.  भारत आणि स्पेनदरम्यान संरक्षणक्षेत्रातले संबंध या प्रकल्पामुळे अधिक दृढ होतील त्याचप्रमाणे मेक इन इंडियालाही बळ मिळेल

असं प्रधानमंत्री मोदी यावेळी म्हणाले. भारत साऱ्या जगासाठी विमानं तयार करील तो दिवस फार दूर नाही असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या संकुलात टाटा व्यतिरिक्त, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड आणि भारत डायनॅमिक्स लिमिटेड या आस्थापना आणि खाजगी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचं देखील योगदान आहे. सी २९५ जातीची ५६ विमानं देशात तयार होणार असून त्यातली ४० विमानं या प्रकल्पात तयार होणार आहेत. १६ विमानं स्पेनमधल्या एअरबस कंपनीत तयार होणार आहेत. या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने दोन्ही नेत्यांनी विमानतळापासून टाटा एअरक्राफ्ट संकुलापर्यंत रोड शो केला. उभय नेत्यांमधे इतर महत्त्वाच्या विषयांवर प्रतिनिधी मंडळ स्तरावर चर्चा होणार आहे. हे वर्ष उभय देशांनी सांस्कृतिक पर्यटन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वर्ष म्हणून साजरं करायचं ठरवलं आहे अशी माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. भारताच्या विमान उद्योग क्षेत्राची दारं या प्रकल्पामुळे युरोपातल्या कंपन्यांसाठी खुली झाली असल्याची प्रतिक्रीया स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ यांनी नोंदवली.

प्रधानमंत्री मोदी आजच्या गुजरात भेटीत सुमारे चार हजार ९०० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांची पायाभरणी तसंच लोकार्पण करणार आहेत. धोळकिया प्रतिष्ठान तर्फे अमरेलीमधे दुधाला इथं विकसित करण्यात आलेल्या भारत माता सरोवराचं आणि इतर पाणीपुरवठा प्रकल्पांच उद्घाटन, तसंच रस्ते, रेल्वे आणि पर्यटनविषयक प्रकल्पांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज विविध उमेदवार आपापले अर्ज दाखल करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात भव्य रॅली काढली आणि कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून अर्ज दाखल केला. त्यांचे पुत्र खासदार

श्रीकांत शिंदे, शिवसेना नेते प्रताप सरनाईक आणि उतर यावेळी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही बारामती मतदारसंघातून आज नामनिर्देशनपत्र दाखल केलं. बारामतीतून महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यावेळी उपस्थित होते. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघातून, तर विश्वजीत कदम यांनी पलूस कडेगावमधून अर्ज भरला. नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले प्रताप चिखलीकर यांनीही आज लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला. खासदार नारायण राणे यांचे पुत्र निलेश राणे यांनी कुडाळमधून उमेदवारी अर्ज भरला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माहीमचे उमेदवार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनीही आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. याशिवाय इतरही नेते अर्ज दाखल करत आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**-<><><><><>**

आसाममच्या ढोलाई, समगुरी, बेहाली, सिडली आणि बोंगाईगाव या पाच विधानसभा जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची छाननी

सुरू आहे, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं.  सत्ताधारी भाजपनं तीन जागांवर, तर यूपीपीएल आणि असम गण परिषदेने प्रत्येकी एका जागेवर अर्ज दाखल केले आहेत. कॉँग्रेसनं पाचही जागांवर उमेदवार उभे केले आहेत. आप आणि बोडोलँड पीपल्स फ्रंटनं, अनुक्रमे दोन आणि एका जागेवर उमेदवार उभे केले आहेत.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्जांची छाननी सुरू आहे. एकंदर ८०५ उमेदवारांनी या टप्प्यात उमेदवारी अर्ज भरले आहेत. अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ३० ऑक्टोबर आहे. १३ नोव्हेंबर रोजी या टप्प्यातल्या ४३ जागांसाठी मतदान होणार आहे. मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. दरम्यान, झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं आज उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली.

**<><><><><>**

जपानमध्ये काल झालेल्या सार्वत्रीक निवडणुकीच्या मतमोजणीत जपानच्या सत्ताधारी लिबरल डेमॉक्रॅटीक युतीला बहुमत गमवावं लागलं. मतमोजणी नुसार विरोधी पक्षांनी कनिष्ठ सभागृहात अर्ध्यापेक्षा जास्त जागा जिंकल्या. डेमॉक्रॅटीक पार्टी आघाडीला  जागा मिळाल्या, तर विरोधी पक्षाला २३५ जागा मिळाल्या. त्यात मुख्य विरोधी पक्ष कॉंस्टीट्युशनल डेमॉक्रॅटीक पार्टीला १४३जागा मिळाल्या. अजून २२ जागांचे निकाल येणं बाकी आहे. सत्तेत येण्यासाठी २३३ जागा जिंकणं गरजेचं आहे. त्यामुळे विरोधी पक्ष सत्तेत येणं जवळपास निश्चित झालं आहे. दरम्यान, जपानच्या स्थैर्यासाठी आणि लोकांच्या जीवाचं रक्षण करण्यासाठी डेमॉक्रॅटीक पक्षाचं सरकार पुन्हा स्थापन करायला अन्य पक्षांनी पाठींबा देण्याचं आवाहन प्रधानमंत्री शिगेरू ईशुबा यांनी केलं आहे.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रांच्या मदत आणि पॅलेस्टाईन निर्वासितांसाठी काम करणारी उनर्वान या संस्थेनं वायव्य स्थित निर्वासितांच्या छावण्यांसाठी आपत्कालीन मदत म्हणून २ कोटी ५० लाख डॉलर्सचं वाटप केलं असल्याचं पॅलेस्टिनी अधिकाऱ्यानं सांगितलं. यात छावण्यांच्या दुरुस्तीचा प्रामुख्यानं समावेश आहे. तसंच स्वच्छताविषयक पायाभूत सुविधांचं पुनर्निर्माण यांचाही समावेश आहे, असंही या अधिकाऱ्यानं सांगितलं.

<><><><><>

देशभरात दीपावलीच्या मंगलपर्वाला आज, गोवत्स द्वादशी म्हणजेच वसुबारसेपासून प्रारंभ झाला. आज, गायवासराची पूजा करून दिवाळीची सुरुवात होईल. येत्या रविवारपर्यंत चालणाऱ्या या प्रकाशोत्सवानिमित्त महाराष्ट्रात सर्वत्र चैतन्याचं वातावरण आहे. मनोवेधक रोषणाईनं बाजारपेठा सजल्या आहेत. आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या या बरोबरच कपडे, दागिने खरेदीसाठी लगबग दिसून येत आहे.

<><><><><>

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्यातल्या जनतेला धनत्रयोदशी तसंच दीपावलीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. आजच्या वसुबारस तसंच उद्या असणाऱ्या धनत्रयोदशीपासून सुरू होणारी दिवाळी आनंद, समृद्धी आणि सुख शांती घेऊन येवो, असं राधाकृष्णन यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आज संध्याकाळी व्हाईट हाऊसमध्ये भारतीय वंशाच्या अमेरिकावासियांसह, राष्ट्राध्यक्ष म्हणून त्यांची शेवटची दिवाळी

साजरी करतील. भारतीय-अमेरिकन समुदाय यांच्यातील संबंध आणखी वृद्धींगत करण्यावर जोर दिला जाईल, असं व्हाईट हाऊस तर्फे जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हटलं आहे. बायडेन व्हाईट हाऊस मधल्या ब्लू रुममध्ये दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाला सुरवात करतील, असंही या निवेदनात म्हटलं आहे. यावेळी विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे.

**<><><><><>**

फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या ऑनलाईन तक्रार निवारण प्रणालीचा प्रारंभ आज नवी दिल्ली इथं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते झाला. या प्रणालीद्वारे तक्रार नोंदणीपासून ते तोडगा काढण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. देशातल्या भात गिरण्यांमधून तयार झालेला भात खरेदी करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं आश्वासन यावेळी प्रल्हाद जोशी यांनी दिलं. तक्रार निवारण करण्याची ही सर्व प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने होईल, अशी माहिती देखील जोशी यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

डिस्लेक्सिया आजाराबद्दल जनजागृतीसाठी आज देशाच्या महत्त्वाच्या इमारतींवर तसंच सरकारी कार्यालयावर लाल दिवा लावण्यात आला आहे. जागतिक स्तरावर ऑक्टोबर महिना हा डिस्लेक्सिया जागरुकतेसाठी पाळला जातो. या आजाराविषयीचे गैरसमज दूर करून जागरुकता वाढवणं आणि या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांप्रति सहानुभूतीची भावना निर्माण करणं, हा यामागचा उद्देश आहे. यानिमित्ताने नवी दिल्ली इथे विजय चौक ते इंडिया गेटपर्यंत वॉक फोर डिस्लेक्सियाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**//<><><><><>//**